महाराष्ट्र पोलीस

# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.

## प्रेसनोट

दिनांक ०८/०३/२०२२

**“ सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने अवैधरित्या शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची मोठ्या प्रमाणात साठवणुक व वाहतूक करुन विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई केलेबाबत.’’**

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सामाजिक सुरक्षा पथक हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक ०७/०३/२०२२ रोजी भोसरी पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची मोठ्या प्रमाणात साठवणुक व वाहतूक करुन करुन विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक ०७/०३/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी भोसरी पोलीस स्टेशन हद्दीत इसम नामे कोमल पाटील हा शासनाने प्रतिबंधीत केलेल्या तंबाखूजन्य गुटख्याची साठवणुक करुन ॲक्टीव्हा नं एमएच १९ डीडब्ल्यु ३९२८ हिचेवर वाहतूक करुन, चक्रपाणी वसाहत रॉयल कॉलनी परिसरात स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी विक्री करीत आहे. अशी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी भोसरी पोलीस स्टेशन हद्दीत ११:३० वाजता चे सुमारास सापळा रचुन छापा टाकुन खालील मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त केला त्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

१) १,३१,०१४/- रु किं चा गुटखा
२) ८०,०००/- रु किं ची ॲक्टीव्हा दुचाकी जु.वा.किं.अं.

-----------------------------------

**असा एकुण २,११,०१४/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे १) कोमल एकनाथ पाटील वय ३२ वर्षे रा. गणेश मंदिर कॉलनी, शास्त्री चौक, आळंदी रोड, भोसरी, पुणे **तसेच पाहिजे आरोपी नामे** २) सतिश पुर्ण नांव पत्ता माहित नाही मोनं ७५५८५५७१४४ ३) रोहन वालवडकर पुर्ण नाव पत्ता माहित नाही वय अंदाजे ४० वर्षे रा. काटेनगर कॉलनी, नंबर ०३, चऱ्होली, पुणे ४) बबन खुशाबा लांडगे वय अंदाजे ६० वर्षे रा. राधाकिसन नगर, कॉलनी नंबर ०३, भोसरी, पुणे यांचेविरुध्द भोसरी पोलीस स्टेशन येथे गुरनं १४९/२०२२ भादंवि कलम ३२८, २७२, २७३, १८८, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास भोसरी पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अप्पर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. काकासाहेब डोळे, मा. सहा. पोलीस आयुक्त डॉ. श्री. प्रशांत अमृतकर, पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि डॉ. अशोक डोंगरे, पोउपनि श्री. धैर्यशिल सोळंके पोलीस अंमलदार किशोर पढेर, सुनिल शिरसाट, अमोल साडेकर, भगवंता मुठे, राजेश कोकाटे, संगिता जाधव, मारुती करचुंडे, अमोल शिंदे, सुमित डमाळ यांनी केली आहे.


TEA